नि. फौ. ख. क्र.२१२/२०१३ निशाणी ६६

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. ६ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – रमेश दौलतराव पवार

वय – ६४ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त, उपविभागीय अधिकारी

पत्ता – कौलखेड रोड, अकोला, ता. जि. अकोला.

**सरकार तर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. आर.लोखंडे यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. दि. १३.१२.२०११ रोजी मी तहसिलदार म्हणुन बाळापुर येथे कार्यरत होतो. आरोपी त्यावेळी तलाठी कार्यालयात निमकर्दा येथे कोतवाल म्हणुन कार्यरत होता. आरोपी तलाठी कार्यालयात नेहमी गैरहजर राहत होता. नायब तहसिलदारा मार्फत माझ्याकडे आरोपीचा चौकशी अहवाल आला. म्हणुन मी आरोपीविरुध्द कारवाई केली. सदर चौकशी अहवालात आरोपीविरुध्द अनियमीत वर्तणुक आणि कार्यालयात गैरहजर राहत असल्याचे नमुद होते. म्हणुन मी महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणुक नियम १९७९ चे कलम ३ प्रमाणे आरोपीविरुध्द कारवाई करुन त्यास बडतर्फ केले. मला आरोपीच्या बडतर्फीचा आदेश दाखविण्यात आला. सदर आदेश नि.क्र. २१ वर दाखल आहे. मी आरोपी गोपाल वंजारे यास ओळखतो.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. एस.टी.इंगळे यांचे मार्फत**

२. मी बुलढाणा येथे तहसिलदार म्हणुन कार्यरत असतांना सन २०१५ मध्ये निलंबित झालो होतो. बाळापुरहुन माझी बदली बार्शिटाकळी येथे झाली. मी बाळुपरला संग्रामपुर, जि. बुलढाणा येथुन बदली होवुन आलो होतो. कोतवाल पदाची नेमणुक मानधनतत्वावर अस्थायी स्वरुपात असते. ज्या प्रकरणाचा मला समन्स आला त्या प्रकरणा संबंधी पोलीसांनी कधीही आजपर्यंत माझे बयान नोंदविले नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे मला या प्रकरणाबद्दल काही माहित नाही. मला आठवत नाही की, दि. ०१.०२.२०१० रोजी मी आरोपी गोपाल वंजारे यास गायगांव येथील तलाठी कार्यालयात रुजु होण्यास सांगितले होते किंवा कसे. नि.क्र. २१ वरील दस्त ही

छायांकित प्रत आहे. हे म्हणणे खरे आहे की, जे व्यक्ती मानधनतत्वावर नोकरी करीत असतात त्या व्यक्तीला त्या नोकरीबद्दल शासनाकडुन देण्यात येणारा कोणताही लाभ – टि.ए., डि.ए. इत्यादी मिळत नाही. अल्पभुधारक म्हणजे ज्याची शेती ५ एकर पेक्षा कमी आहे. त्या व्यक्तीला शेती संबंधी आणि शासनाच्या विविध योजने संबंधी शासनाचे सर्व लाभ मिळतात. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. २१ वरील दिलेला आदेश हा खोटा असुन चुकीचा तयार करुन दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.09.30 11:34:13 +0530

बाळापूर.
दि. २५/०९/२०२५

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.

नि. फौ. ख. क्र.२१२/२०१३ निशाणी ६७

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. ७ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – सुरेंद सखाराम जोशी

वय – ५९ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त, श्रेणी पोलीस निरिक्षक, नागरी हक्क संरक्षण विभाग, अकोला

पत्ता – जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला.

**सरकार तर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. आर.लोखंडे यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. दि. १३.१२.२०१३ रोजी मी पोलीस स्टेशन, उरळ येथे पो.हवा. म्हणुन कार्यरत होतो. त्यावेळी अप. क्र. २३/२०१३ भा.दं.वि. कलम ४२०, ४०९ चा तपास माझ्याकडे आला होता. सदर तपासात मला प्रथम खबरी, फिर्याद, फिर्यादी दाखल केलेले कागदपत्रे इत्यादी दस्तावेज प्राप्त झाले होते. सदर गुन्हयामध्ये मी तपासा दरम्यान फिर्यादी आणि ३ साक्षीदारांकडे विचारपुस करुन जबाब नोंदविले. त्यानंतर मी आरोपीला अटक केली. तपास माझ्याकडे असतांना ठाणेदार श्री. अनिल कुरळकर यांनी कागदपत्र मिळणेबाबत पोलीस स्टेशन, उरळ मार्फत फिर्यादीला पत्र दिले. आता मला सदर पत्र दाखविण्यात आले. त्यावर श्री. कुरळकर यांची सही आहे, त्यांची सही मी ओळखतो. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ६८** देण्यात येते. त्यानंतर माझी बदली झाल्यामुळे ठाणेदार यांच्या आदेशान्वये मी तपास वर्ग केला. मी आरोपी गोपाल वंजारे यास ओळखतो. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. एस.टी.इंगळे यांचे मार्फत**

प्रश्न – तुम्हाला तपासात प्रथम खबरी, फिर्याद, फिर्यादीने दाखल केलेले कागदपत्राची यादी दिली नव्हती ?

उत्तर – सदर सर्व दस्तावेज मला फिर्यादी सोबत असलेल्या सहपत्राप्रमाणे मिळाले होते.

२. रिपोर्ट नि.क्र. २३ वर सहपत्र एक मा. तहसिलदार पत्र क्र. १८७, दि. १३.१२.२०११ असे नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर सहपत्रानुसार मी संबंधीत तहसिलदार यांच्याकडे कोणतीही चौकशी केली नाही व त्यांचे बयान नोंदविले

नाही. मी दि. २३.०४.२०१२ रोजीच्या नि.क्र. २२ वरील पत्रानुसार गट विकास अधिकारी यांच्याकडे चौकशी करुन त्यांचे बयान नोंदविले नाही. दि. २७.१०.२०१० रोजीच्या दैनिक सकाळ आणि दि. २८.०२.२०१० च्या दैनिक देशोन्नती या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या आवाहान संदर्भात मी सदर वृत्तपत्राचे संपादकाकडे जावुन चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवसाचे मुळ वृत्तपत्राच्या प्रती मी संबंधीत संपादकाकडुन प्राप्त करुन घेतल्या नाही. अभिलेखावर दाखल वृत्तपत्राच्या प्रती छायांकित प्रती आहेत. मी सदर वृत्तपत्राच्या मुळ प्रती प्राप्त करुन घेण्याकामी फिर्यादीकडे त्याची मागणी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, रिपोर्ट सोबत दाखल सहपत्र व्यतिरिक्त मी तपासा दरम्यान कोणत्याही व्यक्तीकडुन कोणतेही दस्त प्राप्त करुन घेतले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि. १३.१२.२०११ रोजीच्या मुळ पत्राची मागणी मी तहसिलदारकडे केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि. २३.०४.२०१२ रोजीच्या मुळ पत्राची मागणी मी सचिव, ग्रामपंचायत, निमकर्दा यांच्याकडे केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. २३ सोबत दाखल सहपत्रा व्यतिरिक्त इतर कोणतेही दस्त मला मिळाले नाही व ते मी तपासा दरम्यान प्राप्त करुन घेतले नाही. हे म्हणणे खरे नाही की, तपासा दरम्यान श्री. कुरळकर यांनी गट विकास अधिकारी यांना नि.क्र. ६८ पत्र दिल्याचे मी खोटे सांगत आहे.

३. मी साक्षीदार क्र. २ लक्ष्मीप्रसाद राममनोहर पांडे यांचे बयान त्यांचे सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. त्यांचे बयान नोंदविण्याचे ठिकाण पारस खोडुन अकोला असे केलेले आहे. श्री. पांडे यांनी त्यांच्या बयानात ''आरोपीची मुलगी पल्लवी हिने तिच्या कुटुंबाची माहिती दिली, त्यामध्ये आरोपी कुटुंब प्रमुख असल्याचे सांगितले, तिने असेही सांगितले की, आरोपी त्याच्या कुटुंबात राहत नाही व ते वेगळे राहतात आणि त्यांचे नांव काढुन घ्यावे, कुटुंबामध्ये पल्लवीची आई, भाउ व बहीण असल्याचे त्यांनी सांगितले, त्यांनी सांगितले की, आरोपी व आरोपीची आई हे गावातील हनुमान मंदिराच्या जवळ झोपडी बांधुन स्वतंत्र राहतात'' या बाबी सांगितल्या नाहीत.

४. साक्षीदार क्र. ४ इजहार अहेमद मोहम्मद सालान यांचे बयान घेतल्याचे ठिकाण पारस दाखविलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादी व तीन साक्षीदार यांचे बयान माझ्या सोईनुसार त्यांच्याकडे चौकशी न करता नोंदवुन घेतले. हे म्हणणे खरे नाही

की, माझे सरतपासातील संपुर्ण मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.09.30 11:34:19 +0530

बाळापूर.
दि. २५/०९/२०२५

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.